**<u>नियमित दिवाणी कज्ञा क्र. २३/२०२३ मधील नि.क्र. २३ वरील आदेश</u>**

( पारीत दिनांक – १८/०४/२०२४)

नवसाबाई दादू हवालदार इ.१ वि. पारुबाई बाळू हवालदार इ. ४.

**CNR -MHKO130000972023**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचेविरुध्द झालेला 'कैफियत नाही' असा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा वादी यांनी कायम मनाईसाठी व वाटणीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांना दावेचे समन्स लागू झालेनंतर प्रतिवादी यांनी वकीलांमार्फत वकीलपत्र व पत्तामेमो हजर केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांना सदर कामातील योग्य ती माहिती व कागदपत्रे मिळाली नसल्यामुळे त्यांना कैफियत सादर करता आली नाही. तसेच वकीलांनी म्हणणे सादर केले असेल असे गृहीत धरुन प्रतिवादी मे.कोर्टात उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द 'विना कैफियत' चा आदेश पारित झाला आहे. प्रतिवादी यांनी मुद्दामहून हजर राहून कैफियत देणेचे टाळलेले नाही. सबब, वरील सर्व कारणास्तव कैफियत दाखल करण्यास उशीर झाला आहे. त्यामुळे, तो रद्द करुन मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदर अर्जाच्या मागील बाजुस वादीतर्फे त्यांचे म्हणणे दाखल केले असून, योग्य ते आदेश व्हावेत असे वादीने कथन केले आहे.

४. उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी यांचेविरुध्द 'कैफियत नाही' असा आदेश पारित झालेला नाही. मात्र, कैफियत दाखल करणेकरीताचा कायदयाने विहीत केलेला कालावधी निश्चितच उलटून गेला आहे. कैफियतीच्या स्वरुपात म्हणणे मांडण्याची संधी देणे हे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने गरजेचे आहे. तसे न झाल्यास निश्चितपणे नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादींमुळे जो काही विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादींवरती बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतोः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. २३) प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही खर्च (cost) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो व खर्चाची रक्कम (cost) दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांची 'कैफियत' दाखल करुन घेण्यात येते.

AMOL BHARAT JAWALE
Digitally signed by AMOL BHARAT JAWALE
Date: 2024.04.18 17:35:37 +0900

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – १८/०४/२०२४ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.